**L. A. BILL No. XXVIII OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
LAND REVENUE CODE, 1966.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३७अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३७अ मधील,— १९६६ चा महा. ४१.

(एक) पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) "राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेण्याच्या" या मजकुराऐवजी, "राज्य शासनाच्या मान्यतेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी अधिमूल्य किंवा नजराणा किंवा आकार व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा प्रदान केल्यावर, शासनाने, शासन निर्णय किंवा सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून कोणत्याही शासकीय जमिनीची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल, यास मान्यता दिलेली असेल तर अशी मान्यता या संहितेच्या तरतुदींनुसार वैधपणे दिलेली असल्याचे मानण्यात येईल."; २०१५ चा महा. ४.

(दोन) पोट-कलम (२) मध्ये, "परवानगी" या मजकुराऐवजी, "मान्यता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८. ]**

**[ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात
आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव- ३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.